# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः29.07.2024** **वारःसोमवार**

---

1. पॅरिस ऑलिंपिकमध्ये सहभागी भारतीय खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचं पंतप्रधानांचं मन की बातमधून आवाहन
2. व्याघ्र संवर्धनातील उल्लेखनीय कामगिरीसाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा पंतप्रधानांनी केला गौरवपूर्ण उल्लेख
3. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नेमबाज मनू भाकरनं रचला इतिहास; 10 मीटर एअर पिस्टल प्रकारात कास्य पदकाची कमाई आणि
4. महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेटी क्रिकेट स्पर्धेत भारत उपविजेता

**<u>मन की बात</u>**

पॅरिसमध्ये सुरू झालेल्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय खेळाडूंना जागतिक पातळीवर तिरंगा फडकवण्यासाठी देशातील नागरिकांनी विविध माध्यमातून प्रोत्साहन द्यावं असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमात ते काल बोलत होते. या कार्यक्रमाचा हा 112वा भाग होता. पंतप्रधानांनी आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये सर्वोत्तम  कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्याकडून अनुभव जाणून घेतले तसच त्यांच कौतुक आणि अभिनंदन केलं. यामध्ये पुण्याचा आदित्य वेंकट गणेश आणि सिद्धार्थ चोप्रा, मुंबईचा रुशील माथुर, दिल्लीचा अर्जुन गुप्ता, ग्रेटर नोएडाचा कनव तलवार, आणि गुवाहाटीच्या आनंदो भादुडी या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

हर घर तिरंगा हे अभियान आपल्या राष्ट्रध्वजाचा गौरव करणारा एक उत्सवच झाला असल्याचं सांगून पंतप्रधानांनी येत्या 15 ऑगस्टला हर घर तिरंगा अभियानात सहभागी होण्याचं आवाहन नागरिकांना केलं. तसंच संकेतस्थळावर राष्ट्रध्वजाबरोबरचा फोटो अपलोड करावा, असं सांगून त्यांनी आगामी स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

वाघ आणि मानवी संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी, तसंच वाघांच्या संरक्षणासाठी देशभरात सुरू असलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी दिली. याचं उदाहरण देताना त्यांनी राज्यातल्या ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्पाचाही उल्लेख केला.

पंतप्रधानांनी कालच्या मन की बात या कार्यक्रमात 'परी' म्हणजे पब्लिक आर्ट ऑफ इंडिया या प्रकल्पाविषयी माहिती दिली. कला आणि संस्कृती प्रेमींनी या संदर्भात अधिक काम करावं असं आवाहन त्यांनी केलं. हातमाग आणि इतर स्थानिक उत्पादनं लोकप्रिय करण्यासाठी देशभरातल्या महिलांच्या प्रयत्नांची त्यांनी माहिती दिली. यात त्यांनी महाराष्ट्राची पैठणी तसंच विदर्भातल्या हँड ब्लॉक प्रिंट या हातमाग उत्पादनांचाही उल्लेख केला.

ईशान्येकडील 'चरैदेऊ मैदाम'चा यूनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाल्याचे सांगून भारतातलं हे  43 वं आणि ईशान्येकडील पहिलच वारसा स्थळ असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

**<u>राज्यपाल नियुक्ती</u>**

सध्याचे झारखंडचे राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी विविध राज्यांच्या नवीन राज्यपालांच्या नियुक्तीची घोषणा केली. त्यानुसार महाराष्ट्राच्या विधानसभेचे माजी अध्यक्ष हरी भाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**शपथविधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी काल विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात पार पडला. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. यावेळी पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, भावना गवळी, कृपाल तुमाने, योगेश टिळेकर, प्रज्ञा सातव, शिवाजीराव गर्जे, अमित गोरखे, मिलिंद नार्वेकर, राजेश विटेकर या सदस्यांनी शपथ घेतली. विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी 12 जुलैला मतदान प्रक्रिया पार पडली होती.

**भाजपा**

भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या दोन दिवसांच्या परिषदेचा काल दिल्लीत समारोप झाला. विकसित राष्ट्राचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारनं एकत्रितपणे जोमानं प्रयत्न करणं आवश्यक आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले. भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, तसंच 13 मुख्यमंत्री आणि 15 उपमुख्यमंत्री या परिषदेला उपस्थित होते.

**शरद पवार-नवी मुंबई**

स्त्रियांना आपलं कर्तृत्व दाखवायला संधी द्यायला हवी; समतेचे विचार मांडताना समान संधी समान न्याय देणं गरजेचं असल्याचं प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल नवी मुंबईत केलं. वाशी इथल्या सिडको प्रदर्शनी केंद्रात डॉ. मंगेश आमले यांनी आयोजित केलेल्या देशातील पहिल्या सामाजिक ऐक्य परिषदेत ते बोलत होते.एकसंघ समाज आणि एकसंघ राष्ट्र ही संकल्पना घेवून काम करण्याची गरज आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करायची असेल तर सामाजिक ऐक्य असले पाहिजे असंही पवार यावेळी म्हणाले.

**लातूर-औरंगाबाद**

लातूरमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परिसरात सुरू होत असलेल्या महिलांसाठीच्या वसतीगृहाचं उद्घाटन ग्रामविकास मंत्री आणि लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते काल दूरस्थ माध्यमातून करण्यात आलं. राज्याच्या ग्रामीण आणि शहरी भागातून लातूर इथं आलेल्या शासकीय, निमशासकीय, सेवा क्षेत्रा कार्यरत असलेल्या महिलांना सुरक्षित निवासस्थान मिळावं, त्यांना सामाजिक सुरक्षा मिळावी, यासाठी लातूर जिल्हा नियोजन समितीच्या वतीने हे वसतीगृह उभारण्यात आलं आहे.

**आरोग्य शिबिर-सांगली**

भारतीय सेनेच्यावतीनं सांगलीतील पूरबाधित नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यासाठी काल आरोग्य शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. यात मेजर डॉक्टर विनय यांनी रुग्णांची तपासणी केली. महानगरपालिका क्षेत्रातील पूर ओसरू लागल्यामुळ या भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, संभाव्य पूर परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासन दक्ष आहे नागरिकांनी घाबरून जाऊ नये अस प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केल. पालकमंत्र्यांनी काल कृष्णाघाट मिरज आणि ढवळी तसंच सांगली महानगरपालिका क्षेत्रातील पूरसदृश परिस्थितीची पाहणी केली.

**स्वच्छता मोहीम-नवी मुंबई**

खारफुटीच्या संरक्षण संवर्धनाकरता युनेस्कोने 26 जुलै हा आंतरराष्ट्रीय दिवस पाळण्याच जाहीर केल आहे. त्या निमित्ताने काल नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ऐरोली इथल्या खाडीकिनारी विद्यार्थी आणि नागरिकांच्या सहयोगातून खाडी किनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या विशेष स्वच्छता मोहीमेत 60 गोणी प्लास्टिक बाटल्या, प्रतिबंधात्मक प्लास्टिक, चपला आणि इतर कचरा गोळा करण्यात आला.

**झिका**

पुण्यात आणखी आठ जणांना झिकाची बाधा झाली आहे; त्यामध्ये दहा वर्षांच्या बालकाचाही समावेश आहे. पुण्यातल्या झिका रूग्णांची संख्या आता 45 झाली आहे. झिकाबाधित रुग्णांच्या इतर गुंतागुंतीच्या तपासण्याही आरोग्य विभाग

करत आहे. याबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेला पत्र लिहिलं आहे. एकीकडे झिका रुग्णांची संख्या वाढत असताना पुण्यात डेंग्यूच्या रुग्णांचं प्रमाणही वाढत आहे. या महिन्यात डेंग्यूचे 11; तर चिकनगुनियाचे 8 रुग्ण आढळून आले असल्याचं महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी सांगितलं.

**ऑलिंपिक**

पॅरिसमध्ये सुरू असलेल्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत काल भारताला मानू भाकर हिने 10 मीटर एअर पिस्टल प्रकारात पहिल कास्य पदक मिळवून दिल. 221 पूर्णांक 7 दशांश गुण मिळवत तिनं कास्य पदकावर आपलं नाव कोरलं. नेमबाजी क्रीडा प्रकारात 12 वर्षानंतर भारताला हे पदक मिळालं आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरी बद्दल देशभरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय, यांच्यासह अनेकांनी मानू भाकर हीच अभिनंदन केल आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मानू भाकर हीचं अभिनंदन केलं आहे.

अतिशय प्रतिकूल परिस्थिती, अपुऱ्या सोयी सुविधा, प्रशिक्षणाचा अभाव असूनही सातारच्या प्रवीण जाधव याने तिरंदाजी क्रीडा प्रकारात मजल दर मजल करत ऑलिम्पिक पर्यंत धडक मारली आहे. गेल्या ऑलिम्पिकमध्ये थोडक्यात पदकाने हुलकावणी दिली असली तरी यावेळी मात्र तो पदकला गवसणी घालण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याचे प्रशिक्षक विकास भुजबळ यांनी आकाशवाणीशी बोलताना आपली प्रतिक्रिया नोंदवली....

**महिला क्रिकेट**

महिला आशिया चषक टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत भारताला उपविजेते पदावर समाधान मानावं लागलं. काल झालेल्या अंतिम सामन्यात श्रीलंकेनं भारतावर 8 खेळाडू राखून मात केली. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत निर्धारित 20 षटकात 165 धावा केल्या. श्रीलंकेनं हे आव्हान दोन खेळाडू गामावत पूर्ण केलं आणि विजेतेपदावर आपलं नाव कोरलं.

**हॉकी**

छत्तीसगडमध्ये झालेल्या कनिष्ठ गटाच्या हॉकी इंडिया विभागीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला आणि पुरुष या दोन्ही संघांना उपविजेतेपद मिळालं आहे. पुरुष गटात हॉकी मध्य प्रदेशकडून महाराष्ट्र हॉकी संघाचा 4-6 असा पराभव झाला; तर महिला गटात मध्यप्रदेश संघानेच पेनल्टी शूट आउटमध्ये महाराष्ट्रावर 4-2 अशी मात केली.

**पाऊस**

गडचिरोली जिल्ह्यात काल दिवसभर पाऊस सुरुच होता; त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाल आहे. पुरामुळे गडचिरोली-चामोर्शी आणि आलापल्ली-भामरागड या मार्गांसह जिल्ह्यातील 40 मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे.

बुलडाणा जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पावसाची संततधार सुरु असल्याने जिल्ह्यातील प्रकल्प तुडुंब भरले आहेत. त्यामुळे नागरिकांची पिण्याची पाण्याची समस्या काही प्रमाणात सुटली आहे. 13 तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्याने नदी ओढे पाण्याने भरून वाहत आहेत, शेतामध्ये पाणी साचले आहे.

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यातील सुकळीवीर शिवारात विजेच्या धक्क्याने एका तरुण शेतकऱ्यासह दोन बैलांचा मृत्यू झाल्याची घटना काल घडली. पुणे आणि परिसरात काल पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या.

**हवामान अंदाज**

कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश, विदर्भात तुरळक ठिकाणी वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल.